॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | **Public Relations Office (PRO)** | website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215325 | **जनसंपर्क कार्यालय** | E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/१९८ दि.१९/१०/२०२४

**'ज्ञानतीर्थ-२०२४' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवातील लावणीवर तरुणाई थिरकली**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णुपुरी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानतीर्थ-२०२४' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात दुसऱ्या दिवशी मुख्यमंचावर सादर झालेल्या लावणीने तरुणाई थिरकली.

युवक महोत्सवात लावणी या कलाप्रकाराला प्रेक्षकांचा मोठा प्रतीसाद मिळाला. स्पर्धक कलावंतांनी पारंपारिक पद्धतीने लावण्या सादर केल्या. नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या अदिती केंद्रे हिने 'तुम्ही याव सजना, रंग होळीला' ही शृंगारिक लावणी सादर केली. या लावणीला प्रेषकांच्या टाळ्या आणि शिट्ट्या यांचीमोठी दाद मिळाली. 'तुमच्या पुढ्यात कुटते मी' ही लावणी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरातील ललित व कला संकुलाच्या कु. प्रतीक्षा बुंदराळे हिने सादर केली. या लावणीला प्रेक्षकांनी मोठी दाद मिळाली. नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय नांदेडच्या स्पर्धक यांनी ढोलकीच्या तालावर घुंगराच्या तालावर ही ठसकेबाज लावणी सादर करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. तर दयानंद विज्ञान महाविद्यालय लातूरच्या प्राजक्ता फडके, सायली पंडित, रूपाली गायकवाड, शिवकन्या भद्रे, राधिका झिरमिरे या स्पर्धक कलावंताची पारंपरिक पद्धतीने सादर केलेली सांघिक लावणी आणि 'सवाल जवाब पर जुगलबंदी' प्रेक्षकांना भावली.

युवक महोत्सवाच्या मुख्यमंचावर सकाळपासूनच लावणी हा कलाप्रकारात वेगवेगळ्या संघाने मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन आपली कला सादर केली. लावणी कलाप्रकारात लावणीचे सर्व प्रकार कलावंतांनी सादर केली. त्यास मोठी दाद यावेळी प्रेक्षकातून मिळाली.

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. डी. एन. मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, सल्लागार समितीचे सदस्य डॉ. मा.मा. जाधव, डॉ. कमलाकर चव्हाण, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. विजया भोपाळे, डॉ. संजय जगताप, डॉ. रामचंद्र भिसे, डॉ. राजपाल चिखलिकर, डॉ. गोविंद रामदिनवार आदी उपस्थित होते.

-----------------------------------------------------------------------------------------------------------